# शालिमार पेंट्सची कामगिरी सुधारली

मुंबई : रंगनिर्मितीतील शालिमार पेंट्स ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत ७५.४ कोटींचा महसूल मिळाला आहे. यंदा महसुलात १३ टक्क्यांची वृद्धी झाली. गतवर्षी याच तिमाहीत कंपनीला ६६.७ कोटींचा महसूल मिळाला होता. शालिमार पेंट्सने पश्चिम भारतातील पेंट्सची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी नाशिकमधील प्रकल्प कार्यान्वित करण्याची घोषणा कंपनीने केली आहे. हंगामी अर्थसंकल्पात बांधकाम क्षेत्राला प्रोत्साहन दिल्याने रिअल इस्टेटसंबंधित व्यवसाय वाढवण्याची संधी मिळेल आणि त्याचा पेंट उद्योगालाही लक्षणीय फायदा होईल, असे मत 'शालिमार पेंट्स'चे व्यवस्थापकीय संचालक सुरेंदर भाटिया यांनी व्यक्त केले.